महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/२१७९१
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ०८/०९/२०१७

# परिपत्रक

**विषय :** निलंबन कालावधीतील गोपनीय अहवालाबाबत.

------------

सामान्य आदेश क्र. १० (क) दि. २५/१०/१९६२ अन्वये पूर्वीच्या म.रा.वि.मंडळ व विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या कंपनीमधील अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. याच तरतुदींअंतर्गत गोपनीय अहवाल लिहिण्याकरिता प्रतिवेदक/ प्रतिस्वाक्षरी/स्विकृती अधिकारी वेळोवेळी विहीत करण्यात आलेले आहेत.

२. कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याकरिता अनुसरलेल्या कार्यपध्दतीमध्ये निदर्शनास आले आहे की, एखादा कर्मचारी गैरकृत्याअंतर्गत निलंबीत असेल, अशा कर्मचाऱ्यांच्या निलंबन कालावधीकरिताही काही अधिकाऱ्यांमार्फत गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करुन स्विकृत करण्यात आलेले आहेत. वास्तविकत: गोपनीय अहवालामध्ये संबंधीत कर्मचाऱ्याने मागील वर्षात केलेल्या कामाचे व त्या अनुषंगाने त्याच्या क्षमतेचे मूल्यमापन करण्यात येते. यास्तव, निलंबन कालावधीत संबंधीत कर्मचारी कार्यालयीन कामकाज करीत नसल्याने त्याबाबत गोपनीय अहवाल लिहिणे अपेक्षित नाही.

३. उपरोक्त बाब विचारात घेऊन सर्व प्रतिवेदक अधिकारी यांना सूचीत करण्यात येते की, कर्मचाऱ्यांचे निलंबन कालावधीचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन करण्यात येवू नयेत. तसेच अशा कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती/ उच्चवेतन श्रेणीच्या लाभांच्या प्रकरणी प्रशासकीय परिपत्रक क्र. ५२६ दि. ०८/१२/२०१५ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

८/९/१७

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)